Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. १ जून २०२६ । वर्ष १ । अंक ५७ । पाने २।

DIGITAL EDITION




"लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श निर्माण करणाऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त धुळे जिल्हा धनगर समाजाच्या वतीने पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले."

» Selected

## मालवण एसटी डेपो पीपीपी तत्वावर !



सावंतवाडी : सावंतवाडी, दोडामार्ग आणि मालवण येथील एसटी बस डेपो खाजगी पीपीपी (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) तत्वावर विकसित करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला असून, येत्या ऑगस्ट महिन्यात यासाठीच्या निविदा काढण्यात येणार आहेत. तसेच, डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळाला ३१० कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसत असला, तरी सध्या तरी कोणतीही तिकिट दरवाढ केली जाणार नाही, अशी महत्त्वाची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी येथे दिली. परिवहन मंत्र्यांनी आज सावंतवाडी डेपोला भेट देऊन पाहणी केली, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

### जळगावातून नंदकिशोर महाजनांना संधी; भाजप ११, शिवसेना ४ तर राष्ट्रवादी २ जागांवर लढणार

# विधान परिषदेसाठी भाजपचे 11 उमेदवार जाहीर!

## प्राजक्त तनपुरेंना भाजपकडून मोठी जबाबदारी; रेवती सुळेंचे होणारे सासरे अरुण लखानीही मैदानात

जन सम्राट टाईम्स

**मुंबई : महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने आपल्या ११ उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करत राजकीय वातावरण तापवले आहे. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने या उमेदवारींना मंजुरी दिली असून पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह यांच्या स्वाक्षरीने अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे.**

या यादीत विदर्भ, मराठवाडा, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रभावी नेत्यांना संधी देण्यात आली आहे. जळगाव विधान परिषद मतदारसंघातून भाजपने नंदकिशोर महाजन यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सोडून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्राजक्त तनपुरे यांना अहिल्यानगर मतदारसंघातून उमेदवारी देत पक्षाने त्यांना मोठी राजकीय संधी दिली आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती



सुळे यांचे होणारे सासरे अरुण लखानी यांनाही भाजपने वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे या निवडणुकीला विशेष राजकीय रंग चढला आहे.महायुतीमध्ये जागावाटपाचा फॉर्म्युलाही जवळपास निश्चित झाला आहे. एकूण १७ जागांपैकी भाजप ११ जागांवर निवडणूक लढवणार असून शिवसेना (शिंदे गट) ४ जागांवर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) २ जागांवर उमेदवार उभे करणार आहे.

शिवसेनेकडून किमान सात जागांची मागणी करण्यात आली होती. यासाठी वरिष्ठ स्तरावर प्रयत्नही झाले; मात्र अंतिम वाटपात शिवसेनेच्या वाट्याला ठाणे, नाशिक, परभणी आणि यवतमाळ या चार जागा आल्या. राष्ट्रवादी काँग्रेसला पुणे आणि कोकण या दोन जागांवर समाधान मानावे लागले.

प्राजक्त तनपुरेंना राजकीय बक्षीस?

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतून माघार घेतल्यानंतर प्राजक्त तनपुरे यांच्या राजकीय भवितव्याबाबत विविध चर्चा सुरू होत्या. अखेर भाजपने त्यांना विधान परिषदेची उमेदवारी देत पक्षातील त्यांच्या वाढत्या महत्त्वावर शिक्कामोर्तब केल्याचे मानले जात आहे. विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात आता महायुती आणि महाविकास आघाडी आमनेसामने येणार असून, अनेक मतदारसंघांत चुरशीच्या लढती पाहायला मिळण्याची चिन्हे आहेत. विशेषतः जळगावसह काही महत्त्वाच्या मतदारसंघांतील राजकीय समीकरणांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### भाजपचे उमेदवार कोण?

**भाजपने जाहीर केलेल्या यादीत पुढील उमेदवारांचा समावेश आहे :**

**वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली – अरुण लखानी**
**अमरावती – प्रवीण पोटे**
**सोलापूर – राजेंद्र राऊत**
**सांगली-सातारा – धैर्यशील कदम**
**अहिल्यानगर – प्राजक्त तनपुरे**
**छत्रपती संभाजीनगर-जालना – सुहास शिरसाट**
**नांदेड – अमर राजूरकर**
**धाराशिव-बीड-लातूर – बसवराज पाटील**
**जळगाव – नंदकिशोर महाजन**
**नागपूर – राजीव पोतदार**
**(एकूण ११ उमेदवार)**
**महायुतीचे जागावाटप अंतिम**

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## स्वयंशोध फाउंडेशनतर्फे ९० गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव

### ग्रामीण विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या यशाचा गौरव करण्याच्या उद्देशाने स्वयंशोध फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेला इयत्ता दहावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात नशिराबाद पंचक्रोशीतील तब्बल ९० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हिजन अकॅडमीचे संचालक अनिल माला होते. तर राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या रावेर लोकसभा जिल्हाध्यक्षा व निंभोरा गाव सेवा समितीच्या युवा संयोजिका भाग्यश्री विवेक ठाकरे आणि ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या वृषाली महाजन या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण व्हावी, त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या यशाचे कौतुक व्हावे या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नशिराबादसह मन्यारखेडा, कळगाव, जळगाव खुर्द,



सुनसगाव आणि कडगाव या गावांतील दहावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

### मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असून योग्य दिशा, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर ते कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला नशिराबादचे नगराध्यक्ष योगेश पाटील, उपनगराध्यक्ष पंकजभाऊ महाजन, नगरसेवक चेतनभाऊ बऱ्हाटे, शिवसह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेशभाऊ चव्हाण, मनसेचे जळगाव ग्रामीण जिल्हाध्यक्ष मुकुंदभाऊ रोटे, मनोज नाले यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.


---

## वादळी तडाख्याने केळी उत्पादकांचे नुकसान; यावल, रावेर, मुक्ताईनगरमध्ये बागा भुईसपाट

### ३३ हेक्टरवरील केळी पिकांचे नुकसान, पंचनामे करून तातडीच्या मदतीची शेतकऱ्यांची मागणी

जन सम्राट टाईम्स

**यावल/रावेर/मुक्ताईनगर | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात रविवारी (३१ मे) पहाटे अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान केले आहे. यावल, रावेर आणि मुक्ताईनगर तालुक्यांमध्ये ऐन कापणीसाठी तयार झालेल्या केळीच्या बागा काही मिनिटांत जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला गेला आहे. अनेक शेतकऱ्यांनी लाखो रुपयांची गुंतवणूक केलेली असताना मान्सूनपूर्व वादळाने त्यांच्या आशांवर पाणी फिरवले आहे. यावल तालुक्यात पहाटेच्या सुमारास अचानक वेगवान वादळी वाऱ्यांनी धुमाकूळ घातला. यावल-फैजपूर मार्गावरील परिसरासह अनेक शेतांमधील केळीची झाडे उन्मळून पडली. कापणीयोग्य अवस्थेतील केळीचे घड जमिनीवर कोसळल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. यंदा बाजारपेठेत केळीला समाधानकारक दर मिळत असल्याने शेतकरी चांगल्या उत्पन्नाच्या अपेक्षेत होते. मात्र, निसर्गाच्या या अवकृपेने त्यांच्या सर्व आशा धुळीस मिळाल्या. रावेर तालुक्यात ३३ हेक्टरवरील केळीचे नुकसान रावेर तालुक्यातील निंभोरा,



मोरगाव, खिरवड, विवरे, वडोदरा, भामलवाडी, रेंभोटा, अटवाडे आणि थेरोडे या गावांमध्ये वादळाचा सर्वाधिक फटका बसला. प्राथमिक माहितीनुसार सुमारे ३३ हेक्टर क्षेत्रावरील केळी पिकांचे नुकसान झाले असून ४४ शेतकरी बाधित झाले आहेत. विशेषतः खिरवड आणि अटवाडे परिसरात केळीच्या संपूर्ण रांगा उन्मळून पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. कमलाकर चौधरी, विजय लासूरकर, शिवाजी पाटील, भास्कर लासूरकर, शालिक लासूरकर आणि सुधाकर लासूरकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या बागांचे मोठे नुकसान झाले आहे. मुक्ताईनगरमध्ये खोडे तुटली, बागा जमीनदोस्त मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली परिसरातही वादळाने मोठे नुकसान केले. केळीची खोडे मधोमध तुटून पडली असून काही ठिकाणी संपूर्ण बागाच कोसळल्याचे दिसून आले. शेतकऱ्यांनी मेहनतीने जोपासलेले पीक काही क्षणांत उद्ध्वस्त झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

---

## नशिराबादमध्ये मोफत दंत तपासणी शिबिरास प्रतिसाद

### रूट कॅनल स्पेशालिस्ट डॉ. रोटे व डॉ. हरीश काळे यांचे मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी :** येथील प्रभा मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिक आणि श्री स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत दंत तपासणी व सल्ला शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये नशिराबाद व परिसरातील तब्बल ७० रुग्णांची मोफत दंत व मुख आरोग्य तपासणी करण्यात आली. न्यू इंग्लिश स्कूलसमोरील श्री स्वामी समर्थ केंद्र येथे सायंकाळी ५ ते ८ या वेळेत हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. दातांचे आरोग्य, तोंडाचे आजार तसेच मुख स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या




या उपक्रमाला विविध वयोगटातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. शिबिरात प्रसिद्ध रूट कॅनल स्पेशालिस्ट डॉ. युवराज रोटे (B.D.S., M.D.S.) आणि दंतचिकित्सक डॉ. हरीश काळे यांनी उपस्थित रुग्णांची सखोल तपासणी केली. यावेळी दातांचे विविध आजार, हिरड्यांच्या समस्या, मुख आरोग्य, तोंडातील संसर्ग तसेच आवश्यक उपचारांबाबत रुग्णांना मार्गदर्शन करण्यात आले. तोंडाच्या विविध शस्त्रक्रियांविषयीही उपस्थितांना माहिती देण्यात आली. पुढील उपचारांसाठी हॉस्पिटलमध्ये विशेष सवलत मिळावी यासाठी डिस्काउंट कार्ड देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. त्यामुळे नागरिकांना दर्जेदार दंतसेवा कमी खर्चात उपलब्ध होणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वामी समर्थ केंद्राचे केंद्रप्रमुख रोहिदास बाबा पाटील आणि देविदास बाबा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरादरम्यान नागराजभाऊ महाजन आणि डॉ. प्रमोद आमोदकर यांनी सदिच्छा भेट देत या उपक्रमाचे कौतुक केले. समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आरोग्यविषयक जनजागृती होणे ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. पूर्वेश येवले, हितेश पाटील, युवराज मराठे, सचिन घोडकर, रोहन महाजन, जयेश पाटील, शुभम भावसार, तुषार रंधे, महेंद्र मराठे, अजय राणे, निलेश सुतार आणि प्रवीण मिस्तरी यांनी उपस्थित राहून व्यवस्थापनाची जबाबदारी प्रभावीपणे सांभाळली. आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

---

## दिव्यांगजनांसाठी तंत्रज्ञानाधारित उपायांचा शोध

### 'सॉल्व्हथॉन २०२५-२६' अंतिम फेरी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी तंत्रज्ञानाधारित आणि नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'सॉल्व्हथॉन २०२५-२६ : इनोव्हेट फॉर दिव्यांगजन' स्पर्धेच्या अंतिम निवड प्रक्रियेला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. यशवंतराव चव्हाण सेंटर, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि भारती विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून स्पर्धकांचे मनोबल वाढविले. यामध्ये यशवंत शितोळे, कविता मुरुगकर, केतन कोठारी, पारुल कुमठा यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता. यावेळी उपस्थितांनी दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी संशोधन, नवकल्पना आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालणाऱ्या प्रकल्पांची गरज अधोरेखित केली. दिव्यांगांच्या गरजांवर आधारित अभिनव प्रकल्पांचे सादरीकरण स्पर्धेच्या अंतिम फेरीत विविध जिल्ह्यांमधील आणि राज्यांमधील संघांनी दिव्यांग व्यक्तींच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणारे प्रकल्प सादर केले. यामध्ये पुण्यातील मानव गटाचा 'ब्लाइंड तिकीट सिस्टिम', नाशिकच्या व्हिजनर्स गटाची 'स्मार्ट ब्लाइंड स्टिक', पालघरच्या प्रयास गटाचे दिव्यांगांसाठी रोजगार संधी उपलब्ध करून देणारे व्यासपीठ, आंध्रप्रदेशच्या वी कॅन गटाचे स्वसंरक्षणासाठीचे डिव्हाइस, नाशिकच्या फार्मासिस्ट गटाचे औषध सेवन स्मरणयंत्र, पुण्यातील त्रिनेत्रा गटाचे नाडी




तपासणी यंत्र तसेच नाशिकच्या जीओएम गटाचे 'क्यूआरएक्स इन्फो' हेल्थकेअर ॲप विशेष आकर्षण ठरले. या सर्व प्रकल्पांमध्ये दिव्यांग व्यक्तींना अधिक स्वावलंबी, सुरक्षित आणि सक्षम बनविण्याची क्षमता असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. स्पर्धकांनी आपल्या कल्पना, संशोधन आणि तांत्रिक उपाय प्रभावी पद्धतीने सादर करत परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

### समावेशक आणि सुलभ समाजनिर्मितीकडे महत्त्वाचे पाऊल

दिव्यांग व्यक्तींच्या गरजांचा विचार करून विकसित करण्यात आलेल्या या संकल्पना भविष्यात समाजासाठी उपयुक्त ठरू शकतात. अशा स्पर्धांमुळे सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावी उपाय शोधण्याची प्रेरणा मिळते, तसेच अधिक समावेशक आणि सुलभ समाजनिर्मितीला चालना मिळते, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. आयोजनासाठी विशेष परिश्रम कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी यशवंतराव चव्हाण सेंटरचे संयोजक विजय कान्हेकर, विभाग प्रमुख दिपीका शेरखाने, समन्वयक मनिषा खिल्लारे यांच्यासह राहील शेख, हेजल न्यायनीत, समृद्धी पुजारी, शिवम जाधव आणि संकेत जांभळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

## प्री-प्लॅनिंगचा परिणाम! अक्कलपाडा धरणाचे आवर्तन सुरू

### टंचाईग्रस्त गावांना मोठा दिलासा, आमदार राम भदाणे यांच्या नियोजनाला यश

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे ग्रामीण मतदारसंघातील पाणीटंचाईच्या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून अक्कलपाडा धरणाचे आवर्तन रविवारी सकाळी सुरू करण्यात आले. वाढत्या उन्हामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर धरणाचे दोन दरवाजे २५ सेंटीमीटरने उघडून ५०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मनोहर भदाणे यांच्या हस्ते जलपूजन करून या आवर्तनाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना मनोहर भदाणे यांनी सांगितले की, पूर्वी नियोजनाअभावी अक्कलपाडा धरणाचे आवर्तन केव्हाही सोडले जात असे. त्यामुळे अनेक गावांमध्ये पाणीपुरवठ्याच्या समस्या निर्माण होत होत्या. मात्र यंदा जिल्हा प्रशासन आणि आमदार राम भदाणे यांनी तब्बल सहा महिन्यांपूर्वीच याचे नियोजन केले होते. २९ ऑक्टोबरलाच आवर्तन कधी सोडायचे याचा आराखडा तयार करण्यात आला होता. या प्री-प्लॅनिंगमुळे योग्य वेळी पाणी उपलब्ध होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. अक्कलपाडा धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याचा लाभ धुळे ग्रामीणमधील नेर, कुसुंबा, बिलाडी, वरखेडे, कुंडाणे, न्याहळोद, जापी, शिरडाणे, सातरणे, विश्वनाथ, सुकवड, मोहाडी (प्र. डांगरी),



नूरनगर, अकलाड, मोराणे, मेहेरगाव, वार, कौठळ यांसह अनेक गावांना होणार आहे. तसेच अमळनेर आणि शिंदखेडा तालुक्यातील काही गावांनाही या आवर्तनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा माजी सरपंच शंकरराव खलाणे यांनी आमदार राम भदाणे यांच्या नियोजनाचे कौतुक केले. उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होणार हे लक्षात घेऊन सहा महिन्यांपूर्वीच आवर्तनाचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार प्रशासनाने योग्य वेळी निर्णय घेतल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा फायदा झाला असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी कार्यकारी अभियंता देवेंद्र अग्रवाल, पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी मयूर परदेशी, अजिंक्य पाटील, कालवा निरीक्षक राकेश अहिरे, रवींद्र बोरसे यांच्यासह विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.अक्कलपाडा धरणाचे आवर्तन सुरू झाल्याने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. वेळेवर केलेल्या नियोजनामुळे नागरिक आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून प्रशासन व लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या पुढाकाराचे ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.

### अक्कलपाडा आवर्तनाची ठळक वैशिष्ट्ये

**दोन दरवाजे २५ सेंटीमीटरने उघडले**
**५०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग**
**धुळे ग्रामीणसह अमळनेर व शिंदखेडा तालुक्यांना लाभ**
**सहा महिन्यांपूर्वीच आवर्तनाचे नियोजन**
**पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर मोठा दिलासा**
**नागरिक आणि पशुधनासाठी महत्त्वाचा निर्णय**

# महागाई, स्मार्ट मीटर आणि बेरोजगारीविरोधात बहुजन मुक्ती पार्टीचे 'धक्का मारो आंदोलन'!

## परवानगी नाकारल्यानंतरही संवैधानिक मार्गाने आंदोलन

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** वाढती महागाई, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, पेट्रोल-डिझेल दरवाढ, स्मार्ट मीटर योजना, बेरोजगारी तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित विविध प्रश्नांवर बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने जळगावात 'धक्का मारो आंदोलन' करण्यात आले. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांविरोधात आयोजित या आंदोलनात शेकडो महिला-पुरुष कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक वामन मेश्राम यांनी देशभरातील प्रत्येक जिल्ह्यात तीन टप्प्यांत आंदोलनाची घोषणा केली होती. त्यानुसार तिसऱ्या टप्प्यातील 'धक्का मारो आंदोलन' जळगावात पार पडले. वाढती महागाई आणि स्मार्ट मीटरविरोधात संताप आंदोलनकर्त्यांनी घरगुती गॅसच्या वाढत्या किमती, पेट्रोल-डिझेलवरील करभार, स्मार्ट मीटर योजना, बेरोजगारी आणि शैक्षणिक क्षेत्रातील कथित गैरव्यवस्थापन या मुद्द्यांवर सरकारविरोधात घोषणाबाजी केली. सामान्य नागरिकांवर वाढत्या महागाईचा मोठा आर्थिक भार पडत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. स्मार्ट मीटर योजनेमुळे नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक ताण येत असून, या योजनेचा फायदा केवळ काही उद्योगसमूहांनाच होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. तसेच या प्रक्रियेमुळे अनेक कर्मचाऱ्यांच्या रोजगारावर परिणाम झाल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. आंदोलनासाठी पोलिस प्रशासनाकडे परवानगी मागण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या १३ मे २०२६ रोजीच्या निर्देशांचा हवाला देत पोलिसांनी आंदोलनास परवानगी नाकारली. आदर राखत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. आंदोलनासाठी आलेल्या शेकडो कार्यकर्त्यांनी आपल्या वाहनांसह स्वातंत्र्य चौकातील गांधी उद्यान परिसरात उपस्थिती दर्शविली. यानंतर सर्व वाहने स्वातंत्र्य चौकात उभी करून कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पायी मोर्चा काढला. कोणताही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देता शांततेत निषेध नोंदविण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन आंदोलनाच्या शेवटी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रतिनिधींमार्फत निवेदन सादर करण्यात आले. केंद्र आणि राज्य सरकारने सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

### आंदोलनासाठी मांडलेल्या प्रमुख मागण्या

- घरगुती गॅस सिलिंडर ४०० रुपयांत उपलब्ध करावा.
- पेट्रोल आणि डिझेलवरील जीएसटी दर कमी करावेत.
- इंधन आणि गॅसचा काळाबाजार रोखावा.
- स्मार्ट मीटर योजना तातडीने रद्द करावी.
- भविष्याशी संबंधित कथित अन्यायकारक धोरणे थांबवावीत.
- बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# तितिक्षा कलाकाव्य संध्या आणि यशवंत पुरस्कार सोहळा उत्साहात

## कला आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी :** तितिक्षा इंटरनॅशनल पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'तितिक्षा कलाकाव्य संध्या' आणि 'यशवंत पुरस्कार वितरण सोहळा' ३० मे २०२६ रोजी सदाशिव पेठ येथील भारतीय विचार साधना सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह राज्याच्या विविध भागांतून आलेल्या कवी, साहित्यिक आणि रसिकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मान्यवर साहित्यप्रेमी उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई उपस्थित होत्या. विशेष अतिथी म्हणून जयमाला इनामदार, रजनी भट, राजश्री आठवले, अंजली पटवर्धन, सतीश इंदापूरकर तसेच ज्येष्ठ रंगकर्मी सुहास वाळुंजकर उपस्थित होते. यावेळी तृप्ती देसाई यांनी साहित्य आणि सामाजिक परिवर्तन यांच्यातील दृढ नात्यावर प्रकाश टाकत समाजजागृतीसाठी साहित्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. जयमाला इनामदार यांनी नवोदित लेखक आणि कवींना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. तर सतीश इंदापूरकर यांनी कविता आणि साहित्य हे समाजाशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे मत व्यक्त केले. सुहास वाळुंजकर यांचा गौरव यंदाचा प्रतिष्ठेचा 'तितिक्षा यशवंत पुरस्कार' ज्येष्ठ रंगकर्मी सुहास वाळुंजकर यांना प्रदान करण्यात आला. त्यांनी आपल्या अर्धांगिनी अपर्णा वाळुंजकर यांच्यासह पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांनी आपल्या कलाक्षेत्रातील प्रवासातील अनेक संस्मरणीय क्षणांना उजाळा देत आयोजकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले. काव्यरंगात रंगले साहित्यप्रेमी कार्यक्रमातील 'कलाकाव्य संध्या' हा विशेष आकर्षणाचा भाग ठरला. प्रथम नावनोंदणी करणाऱ्या ३० साहित्यप्रेमींना कविता सादर करण्याची संधी देण्यात आली होती. या काव्य मैफलीत विजय यशवंत सातपुते, प्रा. शरदचंद्र काकडेदेशमुख, रवींद्र गाडगीळ, विलास बाबर, चंद्रकांत जोगदंड, बाबा ठाकूर, अश्विनी पिंपळे, सुधीर कुलकर्णी, दिपराणी गोसावी, ॲड. संध्या देशपांडे, वैशाली अविनाश वर्तक, नंदकिशोर गावडे, संजय वसंत माने आणि गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांच्यासह अनेक कवींनी आपल्या रचना सादर केल्या.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# रोकडोबा हनुमान मंदिरातील चांदीचे मुकुट लंपास

## सराफ व्यापाऱ्याच्या घरफोडीत दागिने चोरी



जन सम्राट टाईम्स

**कल्याण । प्रतिनिधी :** धुळे शहरासह जिल्ह्यात चोरीच्या घटनांनी चिंताजनक स्वरूप धारण केले असून चोरट्यांनी आता देवस्थानांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. धुळे तालुक्यातील प्रसिद्ध रोकडोबा हनुमान मंदिरात चोरट्यांनी धाडसी चोरी करत देवांच्या मूर्तींवरील चांदीचे मुकुट आणि दानपेटीतील ऐवज लंपास केला. तर दुसऱ्या घटनेत शिरपूर तालुक्यात सराफ व्यापाऱ्याच्या घरात घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेण्यात आले. विशेष म्हणजे दोन्ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्या असून पोलिसांसमोर आरोपींना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. रोकडोबा हनुमान मंदिरात धाडसी चोरी मुंबई-आग्रा महामार्गालगत असलेले आणि हजारो भाविकांचे श्रद्धास्थान मानले जाणारे रोकडोबा हनुमान मंदिर चोरट्यांच्या निशाण्यावर आले. अज्ञात चोरट्याने मंदिराच्या खिडकीतून आत प्रवेश करून प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान यांच्या मूर्तींवरील चांदीचे मुकुट चोरून नेले. याशिवाय दानपेटीतील रक्कमेवरही चोरट्यांनी हात साफ केल्याची माहिती समोर आली आहे. सकाळी मंदिर उघडल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच भाविकांनी संताप व्यक्त केला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. शिरपूरात सराफ व्यापाऱ्याच्या घरावर डल्ला दुसरीकडे शिरपूर तालुक्यातील आमोदे शिवारातही चोरट्यांनी घरफोडीची घटना घडवून आणली. गोपाल ज्वेलर्सचे मालक विनय सोनी यांच्या घराला कुलूप असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडले. घरातील सुमारे ६५ हजार रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने चोरून नेण्यात आले. घरमालक परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. याबाबत शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### सीसीटीव्हीत कैद झाले चोरटे

दोन्ही चोरीच्या घटनांमध्ये आरोपींची हालचाल सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाली आहे. त्यामुळे पोलिसांना तपासासाठी महत्त्वाचे धागेदोरे मिळाले असले तरी आरोपींना अटक करण्याचे मोठे आव्हान कायम आहे. पोलिसांकडून फुटेजचे बारकाईने विश्लेषण करण्यात येत असून संशयितांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. जिल्ह्यात सातत्याने वाढत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या धुळे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी शिरोळे यांची नियुक्ती

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने नियुक्ती; कामगारांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी :** शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या धुळे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी सुदाम शिरोळे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या निवडीमुळे धुळे जिल्ह्यातील शिवसैनिक, कामगार आणि समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नियुक्तीनंतर विविध सामाजिक, राजकीय आणि कामगार संघटनांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सुदाम शिरोळे यांच्या नियुक्तीमुळे धुळे ग्रामीण भागातील कामगार चळवळीला नवी दिशा मिळेल, तसेच शिवसेना बांधकाम कामगार सेनेचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष मेळाव्यात ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

शिवसेना पक्षप्रमुख तथा एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना बांधकाम कामगार सेनेचे महाराष्ट्र प्रमुख प्रीतम धारिय आणि उत्तर महाराष्ट्र सचिव अश्विन जामदार यांनी सुदाम शिरोळे यांची दोन वर्षांच्या कालावधीसाठी धुळे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली. कामगारांच्या प्रश्नांना मिळणार प्रभावी व्यासपीठ सुदाम शिरोळे हे सामाजिक आणि संघटनात्मक कार्यात सक्रिय असून, कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवत आले आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे धुळे ग्रामीण भागातील बांधकाम कामगार, कष्टकरी आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेचे कार्य अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कामगारांच्या हक्कांसाठी लढा देणे, संघटन विस्ताराला चालना देणे, या प्रमुख जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविण्यात आल्या आहेत. धुळे ग्रामीण भागात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठीही ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. पक्ष नेतृत्वाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत पक्षवाढीसाठी आणि कामगारांच्या हितासाठी कटिबद्धपणे कार्य करणार असल्याची भावना शिरोळे यांनी व्यक्त केली. स्वागतासाठी कार्यकर्त्यांची गर्दी मुंबईहून धुळ्यात परतल्यानंतर सुदाम शिरोळे यांचे मित्रपरिवार, शिवसैनिक आणि समर्थकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. पुष्पगुच्छ, सत्कार आणि शुभेच्छांच्या माध्यमातून नव्या जबाबदारीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# "माणसातला देव माणूस म्हणजे गुलाबराव पाटील; समाजसेवेचा वारसा जपणे हीच खरी संतसेवा" - साध्वी दीदी करपे यांचे प्रतिपादन

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त कीर्तन महोत्सव

जन सम्राट टाईम्स



**पाळधी / धरणगाव / जळगाव । प्रतिनिधी :** माणसातला देव माणूस म्हणजे आदरणीय गुलाबराव पाटील. समाजसेवा, धर्मकार्य आणि वारकरी संप्रदायाच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्यभर केलेले कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. समाजहितासाठी केलेल्या सेवाकार्याचा वारसा पुढील पिढीने जपणे हीच खरी संतसेवा आहे," असे प्रतिपादन साध्वी सोनाली दीदी करपे यांनी केले.

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबरावजी पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त पाळधी येथे आयोजित भव्य राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवात चौथ्या दिवसाची कीर्तनसेवा साध्वी सोनाली दीदी करपे यांनी अत्यंत प्रभावी, ओजस्वी आणि भावस्पर्शी शब्दांत संपन्न केली. त्यांच्या कीर्तनासाठी हजारो भाविक, वारकरी आणि कीर्तनप्रेमींनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविल्याने संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. संस्कारांचा वारसा जपण्याचा संदेश "माझ्या वडिलांची मिराशी गा देवा, तुझी चरणसेवा पांडुरंगा" या अभंगातील ओळींचा संदर्भ देत त्यांनी अत्यंत हृदयस्पर्शी विचार मांडले. वडिलोपार्जित संपत्तीसोबतच वडिलांनी दिलेले संस्कार, समाजसेवा आणि चांगल्या कार्याचा वारसाही पुढे नेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः युवतींना मार्गदर्शन करताना धर्म, संस्कार आणि कुटुंबाच्या प्रतिष्ठेप्रती निष्ठावान राहण्याचे आवाहन त्यांनी केले. क्षणिक आकर्षण, चुकीचे निर्णय आणि दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तींपासून दूर राहून जीवनातील प्रत्येक निर्णय विवेकाने घ्यावा, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. = मंत्री गुलाबराव पाटील यांच्या कार्याचा गौरव समाजसेवा, धर्मकार्य आणि वारकरी संप्रदायाच्या वृद्धीसाठी मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलेल्या कार्याची परंपरा त्यांच्या सुपुत्रांमध्येही रुजली आहे. प्रतापराव पाटील व विक्रम (विकी बाबा) पाटील हे समाजसेवेचा हा वारसा समर्पित भावनेने पुढे नेत असून, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन प्रत्येकाने समाजहितासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. साध्वी सोनाली दीदी करपे यांच्या अभ्यासपूर्ण, ओजस्वी आणि समाजप्रबोधनपर कीर्तनाने उपस्थित भाविक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. संतविचार, संस्कार आणि समाजसेवेचा संदेश त्यांनी प्रभावीपणे मांडत उपस्थितांच्या मनावर ठसा उमटविला. या भव्य कीर्तन सोहळ्यासाठी श्री ह.भ.प. गौप्रेमी गजाननजी महाराज वरसाडेकर, यज्ञेश महाराज माळी, कैलास महाराज पवार, मयूर महाराज दरेकर, परमेश्वर महाराज पारधीकर, निंबा महाराज वाघडूतकर, अनिल महाराज एकलग्नकर, गोपाल महाराज दापूरेकर यांच्यासह वारकरी संप्रदायातील अनेक मान्यवर महाराज मंडळी उपस्थित होती. हजारो भाविकांच्या उपस्थितीत भक्तीचा महासागर जीपीएस ग्रुप तसेच युवा नेते व जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील आणि विक्रम (विकी बाबा) पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवाला दिवसेंदिवस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भव्य मंडप, आकर्षक व्यासपीठ, उत्कृष्ट ध्वनी व्यवस्था आणि सुयोग्य नियोजनामुळे संपूर्ण परिसर भक्ती, अध्यात्म आणि संतविचारांच्या वातावरणाने भारावून गेला आहे. टाळ-मृदंगाच्या निनादात, विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात चौथ्या दिवसाचा कार्यक्रम जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हजारो भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेत भक्तिरसाचा आनंद लुटला. राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवामुळे संपूर्ण पंचक्रोशीत भक्ती, अध्यात्म आणि संतविचारांचा जागर निर्माण झाला असून हरिनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला आहे.

# एनआरसी कामगारांचा वेतन कराराला विरोध

## कामगारांनी आंदोलनाचा इशारा दिला



जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** एनआरसी कंपनीतील नव्या वेतन कराराविरोधात कामगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी मोठ्या प्रमाणावर एकजूट होत असल्याचे चित्र समोर आले आहे. मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या व्यवस्थापन आणि कामगार युनियनच्या बैठकीत कामगारांसाठी 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे वृत्त समोर आल्यानंतर कामगारांनी या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आहे. "200 कोटींची घोषणा करून कामगारांच्या न्याय्य हक्कांवर पडदा टाकता येणार नाही. आमचा संघर्ष हक्कांसाठी आहे आणि तो शेवटपर्यंत सुरू राहील.", अशा भावना उपस्थित कामगार प्रतिनिधींनी व्यक्त केल्या. या पार्श्वभूमीवर कल्याण येथील यादव नगर परिसरातील महादेव मंदिरात कामगारांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला शेकडो कामगार उपस्थित होते. नव्या कराराचा निषेध करत कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीदरम्यान "200 कोटींची भीक नको, आमच्या हक्कांचा योग्य मोबदला द्या", "कामगारांच्या हक्कांवर गदा मान्य नाही" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही कामगारांच्या अपेक्षांनुसार न्याय मिळत नसल्याचा आरोप उपस्थितांनी केला. कामगार नेते भीमराव डोळस, माजी नगरसेवक जे.सी. कटारिया, शाहीर अर्जुन पाटील आणि अविनाश नाईक यांनी यावेळी आपली भूमिका मांडताना नव्या करारावर तीव्र टीका केली. अनेक वर्षे संघर्ष करूनही कामगारांच्या पदरात फारसे काही पडत नसेल, तर अशा कराराचा उपयोग काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. बैठकीत एनआरसी मजदूर संघाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. कामगारांच्या हिताचे संरक्षण करण्याऐवजी संघटनेने व्यवस्थापनाच्या भूमिकेला पाठिंबा दिल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे हजारो कामगारांचे नुकसान झाल्याचा दावा उपस्थित कामगारांनी केला. कामगारांच्या विश्वासाला तडा गेला असून भविष्यात कामगारांच्या हितासाठी अधिक आक्रमक भूमिका घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. विशेष म्हणजे या बैठकीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या प्रतिमा लावण्यात आल्या होत्या. केंद्र आणि राज्य सरकारने या प्रश्नात हस्तक्षेप करून कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

### एकजुटीने संघर्षात सहभागी होण्याचे आवाहन

पोहोचवणारा कोणताही करार स्वीकारला जाणार नाही. कामगारांच्या आर्थिक, सामाजिक आणि सेवा विषयक हक्कांसाठी संघटित लढा उभारला जाईल. आगामी काळात विविध स्तरांवर बैठका घेऊन आंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार असून सर्व कामगारांनी एकजुटीने संघर्षात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. एनआरसीमधील नव्या वेतन कराराच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेला हा असंतोष भविष्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# विद्यार्थ्यांनी आदर्श समोर ठेवून शिक्षणात उत्तुंग भरारी घ्यावी!

## प्रलंबित प्रश्नांवर एका महिन्यात न्याय देण्याचे आश्वासन : अण्णा बनसोडे

जन सम्राट टाईम्स



**पुणे । प्रतिनिधी:** अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस आणि पुणे महानगरपालिका युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सफाई कामगार व मेहत्तर वाल्मिकी समाजाचा भव्य मेळावा पर्वती दर्शन येथील राजीव गांधी ई-लर्निंग अकॅडमीच्या विजय तेंडुलकर सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आदर्श व्यक्तिमत्त्व समोर ठेवून कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर शिक्षणामध्ये उत्तुंग भरारी घ्यावी," असे प्रेरणादायी आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संघटनेच्या वतीने अण्णा बनसोडे यांचा तुकाराम महाराजांची पगडी, शाल आणि विठ्ठल-रुक्मिणी यांची प्रतिमा देऊन विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोपालराव तंतरपाळे होते. यावेळी दहावी आणि बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर पुणे महानगरपालिकेतील कर्तव्यदक्ष सफाई कामगार तसेच समाजातील आदर्श मातांचाही पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कामगार चळवळीतील योगदानाबद्दल कामगार नेते तथा माजी नगरसेवक सुनिल शिंदे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. कामगारांच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका मार्गदर्शन करताना अण्णा बनसोडे यांनी पुणे महानगरपालिकेतील कामगारांचे प्रलंबित प्रश्न आणि उच्च न्यायालयाच्या निकालासंदर्भातील बाबी गांभीर्याने घेतल्या जातील, असे स्पष्ट केले. संबंधित विषयांवर महापालिका आयुक्तांशी चर्चा करून कामगारांना एका महिन्याच्या आत न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण महत्त्वाचे कार्यक्रमातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देताना समाजाप्रती बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असून युवकांनी ज्ञान, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधावा, असे मतही व्यक्त करण्यात आले. या मेळाव्यास नगरसेवक निलेश आल्हाट, वैशाली भालेराव, सुरज लोखंडे, दिलीप काळोखे, माजी नगरसेवक सचिन तावरे, प्रशांत लोखंडे, विकास कुचेकर, कविराज संघेलिया, डॉ. अनुपकुमार बेगी, नरोत्तम चव्हाण, कणव चव्हाण, महेंद्र चव्हाण, बालाजी आळंदीकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### सूत्रसंचालन तेजस्विनी सडेकर यांनी केले

कार्यक्रमाचे आयोजन परवीनताई लालबिगे (महाराष्ट्र राज्य प्रमुख, इंडियन क्राईम कंट्रोल कौन्सिल) यांनी केले होते. कार्यक्रमाचे निमंत्रक राष्ट्रीय अध्यक्ष सतीश लालबिगे होते. धर्मेंद्र सडेकर, ज्ञानेश्वर माने, आनंद भिंगारदिवे, रवि बेंगळे, सूर्यकांत यादव, तेजस्विनी सडेकर आणि शोभा भांडगे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी सडेकर यांनी केले.